# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


## नियुक्ती आदेश

जा.क्र.आ.आ.से./सिएचएस सीपीएस/नियुक्ती आदेश/न.क्र.१०४/ ४२०/४४० /२०२०
दि.२९/०९/२०२०

**विषय:-** सिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम २०२०-२०२१: खाजगी उमेदवारांचे नियुक्ती आदेश.

संदर्भ:-
१) दि.२७/०९/२०२० रोजी सिएचएस सीपीएस ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली निवड यादी.(द्वितीय फेरी)
२) शासन निर्णय क्रमांक : मवैअ-२०१५/प्र.क्र.८५/सेवा-३ दि. १७ जुलै,२०१५
३) शासन निर्णय क्रमांक : मवैअ-२०१६/प्र.क्र.८५/सेवा-३ दि. २५ जुलै,२०१६

या आदेशान्वये, संचालक, आयुक्तालय आरोग्य सेवा, मुंबई हे खाजगी उमेदवारांना सन २०२०-२१ च्या सीपीएस पदविका सत्रासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विषयांमध्ये व रुग्णालयामध्ये सिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता **पी.जी. हाऊस ऑफीसर** म्हणून नियुक्ती देण्याचे आदेश निर्गमित करित आहेत. ही नियुक्ती खालील नियम व अटींच्या आधारे देण्यात येत आहे.

### नियुक्तीचे नियम व अटी

१) उमेदवारांची ज्या विषयासाठी व ज्या रुग्णालयात निवड झाली आहे त्या विशिष्ठ संस्थेत व विभागात काम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२) उमेदवाराला आदेश प्राप्त होताच उमेदवारांनी दिलेल्या संस्थेत रुजू व्हावे व सीपीएस ऑफीस, परळ, मुंबई यांच्याशी संपर्क साधून नोंदणी (Enrollment) ची प्रक्रिया दि.०८/१०/२०२० पर्यत पूर्ण करावी. यामध्ये सर्व मुळ प्रमाणपत्रे ही स्कॅन करणे गरजेचे आहे आणि Joining, Appointment & Posting Holding Report अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसेच सर्व उमेदवारांना सीपीएस ऑफीस परळ, मुंबई यांचे नियम व फी बंधनकारक असेल.

**३) उमेदवारांनी दिलेल्या संस्थेत रुजू व्हावे व सीपीएस ऑफीस, परळ, मुंबई यांच्याशी संपर्क साधून नोंदणी (Enrollment) ची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर दि.०८/१०/२०२० रोजी पर्यंत सिएचएस सीपीएस प्रवेशाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेला पुर्ण अर्ज स्वाक्षरीसह, प्रथम वार्षिक फी रु.२००,०००/- ची पावती, Joining, Appointment & Post Holding Report यांचा एक संच व मुळ प्रमाणपत्रे सिएचएस सीपीएस कक्ष, १ ला मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डि.मेलो रोड, मुंबई येथे सादर करावे.**

४) उमेदवारांनी त्यांचा सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते सार्वजनिक आरोग्य विभागात किमान २ वर्ष सेवा (रजा व अनुपस्थिती वगळून) करतील असे बंधपत्र (हमीपत्र) (Annexure- H, DHS CPS Information Bulletin २०२०) अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी संचालक, आयुक्तालय आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील. बंधपत्रातील ही अट न पाळल्यास पदविका नोंदणीधारकांना रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) एवढी बंधपत्राची रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल.

५) दि.२९/०९/२०२० रोजी ऑनलाईन पध्दतीने सिएचएस सीपीएसच्या पोर्टलवर प्रसिध्द केलेल्या यादी प्रमाणे उमेदवाराने निवड केलेल्या संस्थेत विहित मुदतीत रुजु न झाल्यास किंवा रुजू होऊन त्यानंतर पुर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास किंवा कोणत्याही कारणास्तव निवड केलेली जागा अभ्यासक्रम पुर्ण न करता वाया घालविल्यास (Seat Lapse) संबंधित उमेदवाराला दंड म्हणून रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल व तसे हमीपत्र अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी सिएचएस सीपीएस कक्ष, आयुक्तालय आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

६) उमेदवारांचा सर्वसाधारणपणे नियुक्तीचा कालावधी सीपीएस पदविकांसाठी सीपीएस कार्यालय, परेल, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे राहील.

७) संबंधित उमेदवारांना रु.२५०००/- इतके मानधन निवड केलेल्या संस्थेद्वारे अदा करण्यात येणार आहे. त्याकरिता आपले हजेरी अहवाल व बँकेचा तपशिल हा संस्थेमधील कार्यरत लिपीक यांस जमा करावा. उमेदवारांचे मासिक विद्यावेतन हे वेळोवेळी मंजुर होणाऱ्या केंद्रशासनाच्या आराखडया प्रमाणे देय राहील अन्यथा केंद्रशासनाकडून निधी मंजुर न झाल्यास त्या उमेदवारास दरमहा रु.७,५००/- इतके विद्यावेतन देण्यात येईल.

८) अभ्यासक्रमाच्या २ वर्षाच्या शैक्षणिक कालावधीत उमेदवारांना सीपीएस हाऊस परेल, मुंबई यांच्या नियमांप्रमाणे वार्षिक ८ दिवस रजा मंजूर आहेत. याव्यतिरिक्त जेवढे दिवस रजा घेतली तितक्या दिवसाचा शैक्षणिक कालावधी वाढविण्यात येईल. रजेवर जातांना उमेदवारांनी संबंधित संस्थाप्रमुखांची व मुख्य प्राध्यपकांची परवानगी घेणे अनिवार्य आहे. तसेच दीर्घ रजेवर जात असल्यास उमेदवाराने राज्य कार्यालयास अवगत करावे. तसेच ज्या उमेदवारांचा २ वर्षाचा शैक्षणिक कालावधी संपुष्टात आला आहे असे उमेदवार आपोआप निवड झालेल्या संस्थेमधून कार्यमुक्त होतील.

९) सिएचएस सीपीएस कोर्सेस प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांना कामासंबंधित तसेच अंतिम परिक्षेच्या तयारीसाठी दैनंदिन कामामध्ये मुभा देण्याबाबत संस्थाप्रमुखांना दि.२७/०९/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना लागु राहतील.

१०) संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधिक्षक यांनी सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची उपलब्धतेनुसार निवासाची व्यवस्था करावी.

११) उपरोक्त संदर्भिय क्र.२ अन्वये शासन निर्णयानुसार उमेदवार संबंधित विषयाची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदविका प्रमाणपत्र कॉलेज ऑफ फिजीशियन्स ॲन्ड सर्जन्स, मुंबई या संस्थेकडून सार्वजनिक आरोग्य विभागास सुपुर्द करण्यात येईल व संबंधित वैदयकीय अधिकाऱ्यांनी निर्धारित बंधपत्रीत सेवा पुर्ण केल्यानंतर सदर प्रमाणपत्र त्यांना अदा करण्यात येईल.

१२) अंतिम सीपीएस परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर परिमंडळाकडून बंधपत्रीत सेवेसाठी नियुक्ती झाल्यावर त्याबाबतचे नियुक्तीपत्र उमेदवाराने राज्य कार्यालयास देखील सादर करावे तसेच बंधपत्रीत सेवा पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र राज्य कार्यालयास सादर करावे. उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी जमा केलेली मुळ प्रमाणपत्रे बंधपत्रीत सेवा पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यावर परत दिले जातील.

वरील नियमांतील कोणत्याही नियमाच्या तरतुदीबदल वाद निर्माण झाल्यास / अर्थाबाबत शंका उपस्थित करण्यांत आल्यास याबाबत मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेली स्पष्टीकरणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील. वरील नियमात कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता / सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२१।१।२०२०

**संचालक**
**आयुक्तालय आरोग्य सेवा,**
**मुंबई.**

**प्रति,**
संबंधित खाजगी उमेदवार

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
१) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)
२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (संबंधित जिल्हा)
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)
४) वैद्यकीय अधिक्षक, स्त्री रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय (संबंधित जिल्हा)

**प्रत सविनय सादर:-**
मा. प्रधान सचिव, सा.आ.वि. (सेवा-३) मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner

# सिएचएस सीपीएस पदव्युत्तर पदविका २०२०-२१ अभ्यासक्रमासाठी निवड केलेल्या खाजगी उमेदवारांची यादी (द्वितीय सत्र)

| Sr. No. | SML | App. No | Candidate Name | Applied Category | Institute Name | Subject | Selected Category | Seat allotted (Inservice / Private) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 50 | 2010019 | MORE AVINASH NARAYAN | OPEN | Civil Hospital, Nashik | DCH | OPEN | Private |
| 2 | 62 | 2010230 | RISHAV DUBEY | OPEN | District Hospital, Beed | DGO | OPEN | In-Service |
| 3 | 67 | 2010238 | TEJA GANESHRAO PATIL | OPEN | District Women Hospital, Latur | DGO | OPEN | Private |
| 4 | 71 | 2010400 | DHRITIDIPA UJJWALKUMAR PODDAR | OPEN | District Hospital, Aundh Camp, Pune | DGO | OPEN | Private |
| 5 | 77 | 2010012 | FAIQUA TAZAYEEN GHAZI ABDUL GHAFOOR | OBC | District Women Hospital, Jalna | DGO | OPEN | Private |
| 6 | 82 | 2010455 | KUNAL SURI | OPEN | District Women Hospital, Akola | DGO | OPEN | Private |
| 7 | 88 | 2010291 | RAHUL KUMAR | OPEN | Sub District Hospital, Gadhingalaj, Kolhapur | DCH | OPEN | In-Service |
| 8 | 215 | 2010091 | HULWAN SHITAL VYANKATRAO | NT-C | District Women Hospital, Jalna | DGO | NT2 | Private |
| 9 | 375 | 2010278 | KALAMBE VARDHINI VIJAYRAO | OBC | Regional Referral Services Hospital, Amravati | DTMH | NT1 | Private |
| 10 | 514 | 2010144 | CHAVAN LEENA SITARAM | ST | District Women Hospital, Jalna | DGO | ST | In-Service |

२९/७/२०२०

संचालक
आयुक्तालय आरोग्य सेवा,
मुंबई

Scanned with CamScanner